परिचर गट-ड या संवर्गातील कर्मचा-यांना कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर पदोन्नती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/४५७/२०२५
अहिल्यानगर दिनांक ३०/०५/२०२५

वाचा:- १. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एपिटी/प्र.क्र.१०००/प्र.क्र.२०२५/आस्था-८ दिनांक ०५/०६/२००३.
२. महाराष्ट्र जि.प.जि.से (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ९ (५)
३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही२०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दिनांक ०१/०८/२०१९.
४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७/०५/२०२१.
५. ग्रामविकास विभागाकडील अधिसुचना जा.क्र.सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७ दिनांक २१ जुलै २०२३
६. पदोन्नती समिती इतिवृत्त दिनांक ११/१०/२०२४

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत परिचर गट-ड या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर वेतनस्तर रुपये एस-०६ १९९००-६३२०० मध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीच्या अधिन राहुन खालील रकाना क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्र.४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम कुशाबाई बारीकराव गिते | ता आ कार्यालय, पंचायत समिती पाथर्डी | जेष्ठतेनुसार | गटशिक्षण कार्यालय पाथर्डी |
| २ | श्रीम संगिता रंगनाथ माने | शिक्षण विभाग (प्राथ) जि प अहिल्यानगर | जेष्ठतेनुसार | म.बा.क जि.प. अ.नगर |
| ३ | श्री बाळासाहेब कारभारी डफळ | पंचायत समिती पाथर्डी | जेष्ठतेनुसार | म.बा.क जि.प. अ.नगर |

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | पदोन्नतीचे पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ४ | श्रीम जया मारुती मधुरकर | पंचायत समिती नगर | जेष्ठतेनुसार | जि.प. बांधकाम उत्तर विभाग |
| ५ | श्रीम रेणुका हरिभाऊ घोडके | पंचायत समिती शेवगाव | जेष्ठतेनुसार | पं. स. शेवगांव |

अटी व शर्ती –

१. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.

२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३. शासन निर्णय दि ०१/०४/२०१०, दि ०२/०३/२०१९ व शासन परिपत्रक दि २८/०७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/ दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४. नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संदर्भ क्रमांक ५ मधील क (एक) नुसार पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचारी यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त सांविधिक विद्यापिठातुन कोणत्याही शाखेतील पदवी धारण करणे आवश्यक आहे. तरी ज्या कर्मचारी यांची सदरची अर्हता धारण केली नाही अशा कर्मचारी यांनी पदोन्नतीच्या दिनांकापासुन पुढील पाच वर्षाच्या आत सदरची अर्हता धारण करील तसे न केल्यास देण्यात आलेल्या पदोन्नतीवरुन पदावनत करणेत कोणतीही हरकत नाही असे आशयाचे प्रमाणपत्र रु १०० च्या बॉडवर कार्यालय प्रमुखांकडे सादर करावे.

६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दि १९/०३/२००३ नुसार संगणकाची अर्हता पदोन्नतीच्या दिनांकपासुन २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल. जर विहीत कालावधीत प्रमाणपत्र धारण केले नाही तर संबंधितांनी संगणक अर्हता धारण करीपर्यंत त्यांची वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

७. पदोन्नतीच्या पदावर हजर झालेनंतर जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परिक्षा ४ वर्षात ३ संधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

८. संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने १५ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा जेष्ठता डावलली जाईल.

..३

९. सदरच आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202505300400103 असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सर्व संबधित परिचर

द्वारा व प्रत :- संबंधित खातेप्रमुख/ कार्यालय प्रमुख

२/- उक्त नमुद केलेप्रमाणे आपले कार्यालयाचे अधिनिस्त कार्यरत परिचर यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेकामी तात्काळ कार्यमुक्त करणेत यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:- निवड नस्ती.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर